नोंदणी क्रं. RNI. MAHMAR/2023/84162
Registration No. MAHMAR/2023/84162

# दैनिक यश सिद्धि न्यूज

संपादक : कमलाकर सोनकांबळे

YASH SIDDHI NEWS

वर्ष - ३ रे Year - 3rd | अंक - १८४ Issue - 184 | वार सोमवार दि. २४ नोव्हेंबर २०२५ Blow- Monday Date 24 November 2025 | ई-पेपर - https://epaper.yashsiddhinews.com वेब पोर्टल - www.yashsiddhinews.com | पाने - ४ Pages - 4 | किंमत - ४.०० रुपये Amount - 4 /- Rs | पोस्टल परवाना : SLP/298/2024-2026 ई-मेल आयडी yashsiddhinews@gmail.com

# २०४७ पर्यंत काँग्रेसला सत्ता नाही

## काँग्रेसकडे विकासाचे व्हिजन नाही; बावनकुळे यांचा हल्लाबोल

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राजकीय वातावरण चांगलच तापल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. सर्वच राजकीय पक्षांनी जोरदार शक्तीप्रदर्शन करत आपापल्या उमेदवारांचा प्रचार सुरु केला आहे. राजकीय नेते ऐकमेकांवर आरोप प्रत्यारोप करत आहेत. आज राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी काँग्रेसवर जोरदार टीका केली. २०४७ पर्यंत केंद्रात आणि राज्यातही काँग्रेसची सत्ता येणार नाही. त्यांच्याकडे विकासाचे व्हिजन नसल्याचे बावनकुळे म्हणाले. ते वाशिममध्ये बोलत होते.



केंद्रात आणि राज्यात २०४७ पर्यंत काँग्रेस ची सत्ता येणार नाही असा विश्वास बावनकुळे यांनी व्यक्त केला. कारण काँग्रेसकडे विकासाचे व्हिजन नाही. या निवडणुकीत फडणवीस सरकारला महाराष्ट्रातील जनतेने १ कोटी अधिक मतांनी निवडून दिले आहे. या विधानसभा निवडणुकीत भाजपा महायुती ला ३ कोटी १८ लाख मतं आहेत. तर काँग्रेस सह महाविकास आघाडी ला २ कोटी १८ लाख मतं मिळाली आहेत. २०२९ मध्येही राज्यात भाजपा महायुतीचं सरकार येणार अल्याचे बावनकुळे म्हणाले. कारण तो पर्यंत भाजपा महायुती मोठे विकासाची कामे करणार आहे. तो पर्यंत काँग्रेस महाविकास आघाडी किंचित किंचित होणार असल्याची टीका महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली. ते वाशिम च्या मालेगांव शहरात भाजपा च्या नगराध्यक्ष नागेश बळी आणि १७ नगर सेवकांच्या प्रचारासाठी तसेच भाजपा कार्यकर्ता मेळाव्यासाठी आले होते. यावेळी त्यांनी महाविकास आघाडी आणि काँग्रेसवर टीका केली.

काँग्रेसवर टीका करताना चंद्रशेखर बावनकुळे म्हणाले की, एका कार्यकर्त्याने काँग्रेस सोडून भाजपमध्ये प्रवेश केला. कारण सांगताना तो म्हणाला की, विजय वडेट्टीवार हे नाना पटोले यांचं तोंड बघायला तयार नाहीत. नाना पटोले हे विजय वडेट्टीवार यांचं तोंड बघायला तयार नाहीत. दोघेही मिळून सुनील केदार यांचं तोंड पाहायला तयार नाहीत. तिघेही मिळून यशोमती ठाकूर यांना विचारत नाहीत. चौघेही मिळून काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ यांनाही विचारत नाहीत आणि पाचही जण मिळून राहुल गांधींना विचारत नाहीत. काँग्रेस पक्षात मोठा विसंवाद आहे. २०२९ पर्यंत काँग्रेस पार्टी ही किंचित पार्टी राहिल. काँग्रेस पार्टी नेतृत्वहीन झाली आहे. कुणाचा पायपोस कुणाच्या पायात नाही.

### मुंबई-नाशिक महामार्गावर कारचा भीषण अपघात

# दोन जणांचा जागीच मृत्यू तर एक जण गंभीर जखमी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



मुंबई : मुंबई नाशिक महामार्गावर कारचा भीषण अपघात झाल्याची घटना घडली आहे. या अपघातात दोघांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर एक जण गंभीर जखमी झाला आहे. मुंबई-नाशिक महामार्गावरुन एक वॅगनार कार भरधाव वेगाने जात असताना चालकाचा गाडीवरील ताबा सुटल्याने हा अपघात झाला आहे. या घटनेमुळं परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. दरम्यान, घटनेनंतर शहापूर पोलीस तात्काळ घटनास्थळी दाखल झाले होते. दरम्यान, या संपूर्ण घटनेचा अधिकचा तपास शहापूर पोलीस करत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, या अपघातात १) मयुरेश विनोद चौधरी वय २९ रा. तानसा २) जयेश किसन शेंडे वय २५ रा. उंबरखाड यांचा जागीच मृत्यू झाला आहे. तर हर्षल पांडूरंग जाधव वय २९ रा. पेंढरघोळ हा गंभीर जखमी असून उपचारासाठी रूग्णालयात दाखल करण्यात आले आहे. अपघात ऐवढा भयानक झाला आहे की कार ने रस्त्याच्या कडेला असलेल्या सरक्षित भिंतीच्या कठड्याला जोरदार धडक देऊन ४० ते ५० फूट लांब जाऊन डिव्हायडरवर आदळली. यामुळं कारच्या पुढील दोन्ही एअरबॅक ओपन झाल्या आणि कार मधील प्रवाश्यांना जब्बर मार लागल्याने दोघांचा मृत्यू झाला, तर एक जण गंभीर जखमी झाला आहेत. सध्या या संपूर्ण घटनेचा तपास शहापूर पोलीस करीत आहे.

गेल्या चार दिवसाखालीच मुंबई नाशिक महामार्गावरील माजिवडा भागात भीषण अपघात झाल्याची घटना घडली होती. या अपघातात कोणीही जखमी नसले तरीही वाहतुक कोंडी झाल्याने कामानिमित्ताने बाहेर पडलेल्या नागरिकांना कोंडीचा सामना सहन करावा लागला. माजिवडा येथील फ्लॉवर व्हॅली परिसरातून बुधवारी सकाळी ७ वाजताच्या सुमारास एक व्हॅन ठाण्याहून मुंबईच्या दिशेने वाहतुक करत होती. त्याचवेळी एका कंटेनरने त्या व्हॅनला धडक दिली. त्यामुळे व्हॅन विरुद्ध दिशेकडील वाहिनीवर जाऊन ठाणे महापालिकेच्या घंटागाडीला धडकली. घटनेची माहिती मिळाल्यानंतर घटनास्थळी वाहतुक पोलीस कर्मचारी, ठाणे महापालिकेच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाचे कर्मचारी, घनकचरा विभागाचे कर्मचारी दाखल झाले. एक हायड्रा मशीन आणि टोविंग व्हॅन मशीन ही यंत्रणा आल्यानंतर येथील अपघातग्रस्त वाहने रस्त्यामधून बाजूला करण्यास सुरुवात झाली.

# औसा नगरपरिषद राष्ट्रवादीच्या ताब्यात द्या विकासाची जबाबदारी मी घेतो - उपमुख्यमंत्री अजित पवार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

औसा प्रतिनिधी/अमर जाधव



औसा नगरपरिषद निवडणूकीच्या निमित्ताने राष्ट्रवादी कॉग्रेस पक्षाच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार परवीन नवबोद्दीन शेख यांच्या प्रचारार्थ महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची सभा आयोजित करण्यात आली होती.

यावेळी अजित पवार म्हणाले, मी माझ्या ३५ वर्षांच्या सार्वजनिक जीवनात कधीही जात, पात, नाती-गोती यांचा विचार केला नाही. शिव-शाहू-फुले-आंबेडकर यांच्या विचारांनी आम्ही चालत आलो आहोत. समता, न्याय आणि विकास हाच आमचा मार्ग आहे. महिलांचा सन्मान, अल्पसंख्याकांचा विश्वास आणि सर्व समाज घटकांचा समान सहभाग, हेच आमच्यासाठी सर्वात महत्त्वाचं आहे असे ते म्हणाले.

औसा नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष डॉ.अफसर शेख यांनी मागील अनेक वर्षापासून औसा शहराच्या विकासाला मोठ्या प्रमाणात चालना दिले आहेत. ऐतिहासिक मराठा भवन स्पर्धा परीक्षा केंद्र, आठवडी बाजार शॉपिंग कॉम्प्लेक्स, शहरातील अंतर्गत सिमेंट रस्ते, नाली बांधकाम, घनकचरा व्यवस्थापन, विविध आवश्यक मुलभूत सुविधा अशा अनेक कामाच्या माध्यमातून आपल्या कामाची धमक दाखवलेली आहे. येणाऱ्या काळात औसा नगर परिषद राष्ट्रवादी काँग्रेसच्या ताब्यात द्या शहराच्या पुढील पाच वर्षाच्या विकासाची जबाबदारी मी घेतो असे प्रतिपादन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले. शनिवार दिनांक २२ नोव्हेंबर रोजी किल्ला मैदान औसा येथे आयोजित विराट सभेत संबोधित केले, पुढे बोलताना ते म्हणाले की औसा हे ऐतिहासिक शहर असून सांस्कृतिक वारसा लाभल्यामुळे येथील सर्व सण उत्सव चांगल्या पध्दतीने सर्व बांधव सहभागी होऊन आनंदाने साजरा करीत असतात.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा धर्मनिरपेक्षतेचा पुरस्कर्ता असून सर्व जाती धर्माला सोबत घेऊन चालणारा हा पक्ष आहे. डॉक्टर अफसर शेख हे सर्वसामान्य जनतेच्या नेहमी सुख दुःखामध्ये सहभागी होत असल्यामुळे त्यांच्या वाट्याला प्रेम आले आहे. स्वर्गीय एनबी शेख यांचे संस्कार त्यांच्यावर असल्यामुळे आपल्या मिळालेल्या पदाचा सदुपयोग त्यांच्या हातून नेहमीच होत आलेला आहे. नगरपरिषदेची निवडणूक ही कार्यकर्त्यांची निवडणूक असून या अशा निवडणुकांच्या माध्यमातून कार्यकर्ता बळकट होत असतो म्हणून येणाऱ्या काळात औसा शहराच्या विकासाला कोणत्याही परिस्थितीत निधीची कमतरता भासू देणार नाही मी राज्याचा अर्थमंत्री म्हणून माझ्या वतीने तसेच राज्य सरकार केंद्र सरकारसह सी एस आर फंडामध्ये आमचा संपर्क असल्यामुळे जास्तीत जास्त निधी आणण्याचा प्रयत्न प्रामाणिकपणे करण्यात येईल असे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी विराट जनसमुदायाला दिले.

(पान २ वर...)

# उमेश पाटलांचा उपमुख्यमंत्री शिंदेंसमोरच राजन पाटलांवर गंभीर आरोप

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सोलापूरच्या मोहोळमध्ये शिवसैनिक पंडित देशमुख यांच्या हत्येचा मुद्दा पुन्हा पेटला असून राष्ट्रवादीचे जिल्हाध्यक्ष उमेश पाटील यांनी थेट उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या उपस्थितीत माजी आमदार राजन पाटील यांच्यावर घणाघाती आरोप केलाय. त्यामुळे २००५ मध्ये झालेल्या पंडित देशमुख हत्येचे प्रकरण पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात केंद्रस्थानी आले आहे.

मोहोळमध्ये भाषण करताना उमेश पाटील म्हणाले की,राज पाटलांविरोधात आवाज उठवला म्हणून पंडित देशमुख यांची हत्या केली. तुमचा शिवसैनिकाची जीभ काढली, पाणी मागत असताना तोंडात लघुशंका केली. बदला म्हणून शिवसैनिकांनी त्या युवा नेत्याला मोहोळमध्ये पाय ठेवू दिले नव्हते. स्वतःला शिवसैनिक म्हणणाऱ्या नेत्यांनी त्यांच्याकडे जाऊन संधान बांधले आणि आमच्या एकीला छेद दिला. मोहोळमध्ये आपण निधी दिला, त्यात माजी आमदार ठेकेदारकडून टक्केवारी वसुल करतोय. आम्हाला चिन्ह, पक्ष महत्वाचा नाही. राजन पाटलांचा पराभव महत्त्वाचा आहे. अनगरला उमेदवारी अर्ज भरण्यासाठी जाताना घ४७ घेऊन संरक्षणात जावे लागले. अनगरची घाण मोहोळमध्ये येऊ द्यायची नसेल तर धनुष्यबाण निवडून दिला पाहिजे. तडीपार असलेल्या दोन माणसांना उमेदवारी दिली, असे महंत त्यांनी राजन पाटील यांच्यावर जोरदार हल्लाबोल केलाय.

**पंडित देशमुख हत्येचे प्रकरण पुन्हा एकदा राजकीय वर्तुळात केंद्रस्थानी**

**शिवसैनिकाचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही : एकनाथ शिंदे**

तर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, पंडित देशमुख यांचा मर्डर झाल्याचं जे उमेश पाटील यांनी सांगितलं, त्यामध्ये जो कोणी असेल त्याला शिक्षा झाली पाहिजे. चुकीला माफी नाही, म्हणून तुम्हाला जो कोणी वकील, हरीष साळवे वगैरे वकील पाहिजे, त्याची नेमणूक करण्याचे काम आम्ही करू. शिवसैनिकाचे बलिदान व्यर्थ जाऊ देणार नाही. महाराष्ट्रात अशी गुंडागर्दी खपवून घेणार नाही. महाराष्ट्र हा पुरोगामी आहे. मी ज्याच्या मागे उभा राहतो, त्याच्या मागे खंबीरपणे उभा राहतो. परिणामाची चिंता करत नाही. तुम्हा सर्वांच्या पाठीमागे मी खंबीरपणे उभा आहे, असे त्यांनी यावेळी म्हटले.

दरम्यान, २००५ मध्ये शिवसेनेचे उपतालुका प्रमुख पंडित देशमुख यांची निर्घृण हत्या करण्यात आली होती. या प्रकरणी राजन पाटलांचे चिरंजीव बाळराजे पाटील यांच्यासह १३ जणांवर आरोप करण्यात आले आहेत. मात्र सत्र न्यायालयाने सर्व आरोपींची निर्दोष सुटका केली आहे. मात्र, आता उमेश पाटील यांनी राजन पाटील यांच्यावर टीका केल्याने हे प्रकरण पुन्हा एकदा चर्चेत आले आहे.

### नाव न घेता राज ठाकरेंचा सत्ताधाऱ्यांवर हल्लाबोल

# गाफील राहू नका, मुंबई गेली तर हे लोक थैमान घालतील

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**


मुंबई : आगामी काळात होणाऱ्या मुंबई महानगर पालिकेच्या अनुषंगाने मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मोठं वक्तव्य केलं आहे. मुंबई महापालिकेच्या निवडणुकीत जर आपण गाफील राहिलो तर मराठी माणसांसाठी ही शेवटची निवडणूक असेल असंही राज ठाकरे म्हणाले. एकदा मुंबई हातातून गेली तर आपल्याला कोणालाही काही जमणार नाही. हातातून मुंबई गेली तर हे लोक थैमान घालतील असे म्हणत नाव न घेता राज ठाकरेंनी सत्ताधारी पक्षांवर हल्लाबोल केला. ते मुंबईमध्ये आयोजित करण्यात आलेल्या कोकण महोत्सवात बोलत होते.



रात्र वैऱ्याची आहे त्यामुळे गाफील राहू नका मतदार याद्या तपासून पाहा असेही राज ठाकरे म्हणाले. थोडे दिवस थांबा भाषण सुरुच होतील. ११ वर्ष हा कोकण महोत्सव साजरा होत आहे. मला फक्त जाता जाता एवढीच गोष्ट सांगायची आहे की, रात्र वैऱ्याची आहे गाफील राहू नका आजूबाजूला लक्ष ठेवा. ज्या प्रकारे राजकारण सुरू आहे, मतदार याद्या ज्या काही सुरू आहेत त्यावरती लक्ष ठेवा. मतदार खरी आहे खोटे आहे याच्यावरती पण तुमचं लक्ष असणं गरजेचं आहे. मराठी माणसासाठी ही येणारी मुंबई महानगरपालिकेची निवडणूक शेवटची निवडणूक असेल असंही ते म्हणाले. जर आपण गाफील राहिलो तर हातातून गेली समजा असेही राज ठाकरे म्हणाले. थोडे दिवस थांबा भाषण सुरुच होतील असेही राज ठाकरे म्हणाले.

राज्यात सध्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका सुरू आहेत, नगर परिषद आणि नगर पंचायत निवडणुकांनंतर लगेचच महापालिका निवडणुका देखील होण्याची शक्यता आहे. दरम्यान विरोधकांकडून सातत्यानं निवडणूक याद्यांमध्ये घोळ असल्याचा दावा करत निवडणूक आयोगावर गंभीर आरोप करण्यात येत आहेत. आज पुन्हा एकदा मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी निवडणूक आयोगासह सत्ताध्याऱ्यांवर याच मुद्द्यावरून जोरदार हल्लाबोल केला आहे. ते मुंबईमध्ये आयोजित कोकण महोत्सवात बोलत होते. रात्र वैऱ्याची आहे, गाफील राहू नका, आजूबाजूला लक्ष ठेवा. ज्या प्रकारे राजकारण सुरू आहे, मतदार याद्यांमध्ये जे काही सुरू आहे, त्यावर लक्ष ठेवा असं यावेळी राज ठाकरे यांनी म्हटलं आहे.

जिल्हा परिषद व नगरपालिका निवडणूक




प्रचार साहित्य

अत्याधुनिक निवडणूक मोबाईल ॲप फक्त आमच्या कडेच
वापरा व हमखास निवडून या.



मतदार स्लिप
नांव व मतदान केंद्रासहीत
फक्त आमच्याकडेच मिळतील.

प्रचार साहित्य
१. डमी वोटिंग मशिन
२. झेंडे, टोपी, पंचा ३. बिल्ले
४. मतदार स्लिप ५. स्टिकर ६. पॉम्प्लेटस
७. स्लिप प्रिंटर ८. सॉफ्टवेअर
९. बॅचेस १०. एस.एम.एस./व्हाईस कॉल

नितीन कन्सलटन्सी
नितीन हलसगी
मो. 9595427070 / 9270325070

## संपादकीय....

### जागरूक राहणे गरजेचे

दहशतवादाविरुद्धचे युद्ध संपलेले नाही. या दहशतवादाच्या विरोधात लढण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजग आणि सतर्क असले पाहिजे. कान आणि डोळे बनून सुरक्षेचे काम केले पाहिजे, असे आवाहन नुकतेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. २६/११ या काळजाला भिडणाऱ्या घटनेला १७ वर्षे झाली असली तरी त्या दिवसाची वेदना आजही आपणा सर्वांच्या मनात कायम असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईसह देशभरात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या हल्ल्यातील शहीदांना आदरांजली देण्यासाठी आणि हुतात्म्यांच्या स्मृती ताज्या ठेवण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. पहलगाम येथे निष्पाप नागरिकांची हत्या करून दहशतवादी संघटना देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आहेत. अशा घटनांवरून आजही दहशतवादाचा धोका कायम असल्याचे स्पष्ट होत असून, प्रत्येक नागरिकाने सतर्क राहणे अत्यंत गरजेचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २६/११ चा हल्ला हा ताज किंवा मुंबईपुरता मर्यादित नव्हता. जसा अमेरिका 'ट्विन टॉवर' हल्ला म्हणजे अमेरिकेच्या सार्वभौमत्वावरील हल्ला होता, तसाच २६/११ चा हल्ला हा संपूर्ण भारताच्या सार्वभौमत्वाला दिलेला मोठा धक्का होता. त्या काळात ठोस प्रतिउत्तर दिले असते तर कदाचित पुन्हा असा हल्ला झाला नसता. परंतु आता परिस्थिती बदलली असून भारत मजबूत, सक्षम आणि निर्णायक देश म्हणून जगासमोर उभा आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर कारवाई करत जगाला आपली क्षमता दाखवून दिली. भारत निर्णायक कारवाई करणारा देश आहे. आज देशाची सुरक्षा यंत्रणा अत्यंत मजबूत झाली आहे. दिल्ली बॉम्बस्फोटापूर्वी सुरक्षा यंत्रणांनी मोठ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ आणि शस्त्रे जप्त करून मोठा कट उधळून लावला आहे. दहशतवादी सरळ युद्ध करू शकत नाहीत म्हणून छुपे युद्ध सुरू आहे. अशा परिस्थितीत देशातील प्रत्येक नागरिकाने सतत जागरूक राहणे गरजेचे आहे.

# गुरु तेग बहादूर : मानवतेचे रक्षक

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

भारतीय संस्कृतीचा आणि मानवतेच्या इतिहासाचा अभ्यास करताना काही व्यक्तिमत्त्वे अशी भेटतात की ज्यांचे जीवन, विचार, आणि बलिदान केवळ एका धर्मापुरते मर्यादित राहत नाही, तर संपूर्ण मानवजातीसाठी प्रेरणादायी ठरते. अशाच तेजस्वी व्यक्तिमत्त्वांपैकी एक म्हणजे शीख धर्माचे नववे गुरु 'गुरु तेग बहादूर' होते. २४ नोव्हेंबर हा दिवस संपूर्ण भारत देश त्यांच्या बलिदानाची, त्यांच्या मूल्यांची आणि त्यांच्या अद्वितीय मानवतावादी विचारांची स्मृती जागवतो. हा दिवस केवळ एका धार्मिक गुरूच्या हौतात्म्याचा दिवस नाही, तर मानवी हक्क, धार्मिक स्वातंत्र्य, सामाजिक न्याय आणि आत्मगौरवासाठी प्राणार्पण करणाऱ्या महापुरुषाचा वैश्विक स्मरणदिन आहे.

गुरु तेग बहादूर यांचे संपूर्ण जीवन हे सामाजिक बांधिलकी, समता, दीनदुबळ्यांचे रक्षण, शांतता, अध्यात्म आणि संघर्षातील धैर्याचे प्रतीक आहे. इतिहासात अनेक योद्धे लढले, अनेक सम्राटांनी सत्ता मिळवली, अनेक विद्वानांनी ज्ञान दिले, परंतु एखाद्याच्या धर्म, संस्कृती आणि श्रद्धेचे रक्षण करण्यासाठी स्वतःचा जीवदान देणारी व्यक्ती विरळच आढळते. गुरु तेग बहादूर यांचे बलिदान हा जगाच्या इतिहासात अभूतपूर्व प्रसंग आहे.

गुरु तेग बहादूर यांच्या काळातील भारत देश हा राजकीय संघर्ष, धार्मिक अंधश्रद्धा, जातिभेद, आणि अत्याचाराच्या छायांनी वेढलेले होता. मुगल सत्तेचा प्रभाव वाढत होता, आणि औरंगजेब धर्मांतराच्या धोरणातून इस्लामिकरणाचा प्रसार करू इच्छित होता. हिंदू, जैन, सूफी, बौद्ध आणि अनेक समुदायांवर धर्मांतराचा दबाव वाढत होता. काश्मीरच्या विद्वान पंडितांनी आपल्या अस्तित्वाच्या रक्षणासाठी दिल्ली नव्हे, तर पंजाब गाठले आणि तेथे त्यांनी आशेचा किरण म्हणजे गुरु तेग बहादूर यांना भेटले. त्यांच्या वेदनादायी कथा ऐकून गुरुजींनी जो निर्णय घेतला, तो इतिहासातील सर्वात मोठा न्याय, स्वातंत्र्य आणि मानवतेचे रक्षण करणारा निर्णय ठरला.

गुरु तेग बहादूर यांनी समतेवर आधारित समाज बांधण्यासाठी श्रद्धेची शक्ती, क्षमेचे दर्शन आणि न्यायाची भावना जोपासली. त्यांच्या शिकवणींमध्ये भीतीवर मात हे केंद्रस्थानी होते. स्वतःच्या ग्रंथांत त्यांनी लिहिले आहे की जो डरता नाही, जो दुसऱ्याला घाबरवत नाही, तोच खरा ज्ञानी आणि मुक्त आहे. त्यांचा संदेश स्पष्ट होता की मनुष्याने मुक्त जगावे. त्याची श्रद्धा, अस्तित्व आणि स्वाभिमानावर कुणाचाही अंमल चालू नये. त्यांच्या कार्याचा केंद्रबिंदू समाजाचा सर्वांगीण विकास हा होता. अनेक स्थळी त्यांनी गुरुद्वारे स्थापन करून 'लंगर' या परंपरेला अधिक बळ दिले. लंगर ही केवळ भूक भागविण्याची पद्धत नव्हती, तर समता, बंधुता आणि जातिनिरपेक्ष सामाजिक एकतेचा प्रयोग होता. त्या काळातील जातिव्यवस्थेच्या कठोरतेला धक्का देणारी ही सामाजिक क्रांतीच होती. एका थाळीत श्रीमंत-गरीब, हिंदू-मुस्लिम, ब्राह्मण-शूद्र, राजा-प्रजा सगळ्यांनी बसून भोजन करणे हा एक मौन सामाजिक संदेश होता. या संदेशामधून मानवात भेद नाही. हे स्पष्ट होत होते.

गुरु तेग बहादूर यांची समाजकार्याची दृष्टी केवळ धार्मिक मर्यादांपुरती नव्हती. त्यांनी अनेक गावांत विहिरी, तलाव, रस्ते, विश्राम गृहे आणि आश्रयधामे बांधली. त्यांच्या शिकवणीत मानवी समतोल, मानसिक शांती आणि सामाजिक जबाबदारी या तीन स्तंभांचा प्रभाव दिसून येतो. त्यांनी लोकांना ध्यान, संयम आणि निष्ठेने जीवन जगण्याची प्रेरणा दिली.

त्यांचे व्यक्तिमत्त्व केवळ अध्यात्मिक नव्हते; ते एक शूर योद्धेही होते. त्यांच्या बालपणातच 'गुरु हरगोबिंद साहिब' यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांनी शौर्य, अस्त्र-शस्त्र प्रशिक्षण आणि राष्ट्रसेवेचे धडे घेतले. त्यामुळेच, जेव्हा स्वातंत्र्यावर गदा येत होती, तेव्हा त्यांनी मौन साधना नाही केली, तर थेट अन्यायाच्या विरोधात उभे राहण्याचा निर्णय घेतला. आणि मग आला इतिहासातील अंधाऱ्या अत्याचारांचा क्षण. जेव्हा काश्मीरी पंडितांच्या धर्मरक्षणासाठी त्यांनी स्वतःचा जीव अर्पण करण्याचे ठरवले. त्यांनी औरंगजेबाला स्पष्ट संदेश दिला होता की, जर मी धर्मांतर केले तर लाखो हिंदू धर्मांतर करतील, आणि जर मी प्राण दिले तर भविष्यात कोणीही धर्मावर अत्याचार करण्याचे धाडस करणार नाही.

दिल्लीच्या लाल किल्ल्याच्या कारागृहात त्यांच्यावर अत्याचार करण्यात आले, पण त्यांनी धर्म, न्याय आणि स्वातंत्र्य यांची बाजू सोडली नाही. २४ नोव्हेंबर १६७५ रोजी दिल्लीतील चांदणी चौकात त्यांचा शिरच्छेद करण्यात आला. आज त्या ठिकाणी उभे असलेले 'गुरुद्वारा शीश गंज साहिब' हे केवळ धार्मिक स्थळ नाही तर ते 'मानवी हक्कांचे आणि स्वातंत्र्याचे स्मारक आहे. त्यांच्या बलिदानाचा प्रभाव भारतीय समाजात आणि जगभरातील मानवतावादी विचारांतून दिसून येतो. भारताच्या संविधानात अंतर्भूत असलेल्या धर्मस्वातंत्र्याच्या अधिकाराचा बीजकण गुरु तेग बहादूर यांच्या बलिदानातूनच उगवलेला दिसतो. ते जगाला शिकवून गेले की स्वत:साठी जगणारा सामान्य असतो, परंतु दुसऱ्याच्या स्वाभिमानासाठी प्राण देणारा अमर असतो.

आजच्या काळात गुरु तेग बहादूर यांचे जीवन आपल्याला काही महत्त्वपूर्ण मूल्ये सांगते, ते म्हणजे समाजाला समता हवी, भीती नव्हे; संवाद हवा, संघर्ष नव्हे; मानवता हवी, हिंसा नव्हे; मन मुक्त हवे, शरीर नाही.



धार्मिक स्वातंत्र्याच्या नावाखाली अजूनही जगात हिंसा घडते. जात, धर्म, वंश, भाषा यावरून अजूनही संघर्ष होतात. अशा काळात गुरु तेग बहादूर यांचे बलिदान आपल्याला आठवण करून देते की 'मानवता सर्वात श्रेष्ठ धर्म आहे.' त्यांचे बलिदान हा केवळ इतिहासातील प्रसंग नाही तर तो न्याय, स्वातंत्र्य, विविधता आणि मानवतेच्या स्वीकाराचा एक जिवंत संदेश आहे.

आज, त्यांच्या शहीद दिनानिमित्त भारतासह जगभरातील समाज एक प्रश्न विचारतो की आपण मानवतेचे रक्षण करण्यासाठी कितपत तयार आहोत? गुरु तेग बहादूर आपल्याला शिकवतात की समाजातील दुर्बल, शोषित, पीडित वर्गासाठी आवाज उठवणे ही केवळ जबाबदारी नाही तर ते एक मानवी कर्तव्य आहे. त्यांच्या जीवनाने दाखवून दिले की धर्म म्हणजे इतरांचा धर्म नष्ट करणे नव्हे, तर प्रत्येकाच्या श्रद्धेचा सन्मान करणे होय. त्यांचे स्मरण केवळ धार्मिक नाही तर ते राष्ट्रीय, सामाजिक आणि मानवतावादी वारसा आहे. आजचा दिवस हा केवळ त्यांच्या शहादतीचा स्मरणदिन नाही, तर त्यांच्या विचारांचे पुनरुज्जीवन करण्याचा दिवस आहे.

गुरु तेग बहादूर यांचे जीवन हे जळणारे दीप आहे 'जे अंधारातही प्रकाश देते, भीतीतही आत्मविश्वास देते, आणि संघर्षातही सत्य न सोडण्याची प्रेरणा देते. या महान विभूतीला विनम्र अभिवादन.

**– डॉ. राजेंद्र बगाटे**
**(लेखक समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)**
**मो. ९९६०१०३५८२,**
**ईमेल – bagate.rajendra5@gmail.com**

# मुंबईतील स्वच्छता विषयक 'सुविधा केंद्र' उपक्रम पथदर्शी : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबईत २४ केंद्रे, ९ प्रगतीपथावर; ७.५ लाख नागरिकांना स्वच्छतेचे शिक्षण, ५.५ लाख नागरिकांनी घेतला सुविधा केंद्राचा लाभ**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : शहरी क्षेत्रातील स्वच्छता, पाणी-बचत आणि आरोग्य सुधारणा यासाठी सामाजिक उत्तरदायित्व निधीमधून मुंबईत राबवण्यात आलेला 'सुविधा केंद्र' उपक्रम आदर्श मॉडेल ठरत असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून राज्यात स्वच्छ महाराष्ट्र अभियान गती घेत आहे. मुख्यमंत्री फडणवीस यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत या अभियानात विविध संस्था जोडल्या जात आहेत.

हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संयुक्त भागीदारीत सुरू झालेल्या या उपक्रमाने अल्पावधीत मोठे परिणाम साधले आहेत. सध्या मुंबईत २३ केंद्रे कार्यरत असून, लवकरच २४ वे केंद्र सुरू होणार आहे. मुंबईत आणखी २ केंद्रे बांधकामाधीन असून ७ केंद्रांचे प्रस्ताव प्रगतीपथावर आहेत. बृहन्मुंबई महानगरपालिका, हिंदुस्थान युनिलिव्हर लिमिटेड, एचएसबीसी आणि जेएसडब्ल्यू फाउंडेशन यांच्या सहकार्याने ही योजना पुढील काही वर्षांत अधिक विस्तारणार आहे. शहरातील झोपडपट्टी आणि वंचित वस्त्यांसाठी सुरक्षित, स्वच्छ आणि परवडणाऱ्या स्वच्छता सुविधा देण्याचे उद्दिष्ट या केंद्रांमागे आहे. ५.५ लाख नागरिकांना आतापर्यंत याचा प्रत्यक्ष लाभ झाला असून, आरोग्यदृष्ट्यादेखील हे मॉडेल उपयुक्त ठरत असल्याचे स्पष्ट झाले आहे. सुविधा केंद्रे ही स्वच्छतेच्या शाश्वत व्यवस्थेचे महत्त्वपूर्ण घटक असून त्यामुळे मुंबई महानगर प्रदेशात आणखी सुविधा केंद्रे सुरू करण्याचे निर्देश मुख्यमंत्री फडणवीस यांनी दिले आहेत.

**मुंबई महानगर प्रदेशात स्वच्छ महाराष्ट्र अभियानाला गती**

या प्रकल्पासंदर्भात मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईसारख्या प्रचंड लोकसंख्या असलेल्या महानगरात 'सुविधा केंद्र' मॉडेलने सार्वजनिक-खासगी भागीदारीतून उत्तम कामाचे उदाहरण निर्माण केले आहे. ही केंद्रे शहराच्या आरोग्यसुरक्षेत मोठे योगदान देत आहेत. या सुविधा केंद्रामध्ये उत्तम सुविधा, लोकसहभाग, वर्तणूक बदल, आर्थिक आणि पर्यावरण टिकाव आणि कार्यक्षम संचालन यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. हे सर्व अत्यंत उल्लेखनीय असून हा उपक्रम शहरी महाराष्ट्रासाठी आदर्शवत आहे.




झोपडपट्टी व अनौपचारिक वसाहतींतील महिलांसाठी सुरक्षित शौचालय, मुलांसाठी स्वच्छ जागा, दिव्यांगांसाठी सुलभ रचना - या सर्व बाबींमुळे सुविधा केंद्रे अत्यंत लोकाभिमुख झाली आहेत. जल-बचत तंत्रज्ञान, ऊर्जा कार्यक्षमता आणि कचरा व्यवस्थापन यामुळे पर्यावरणीय शाश्वततेचा उत्तम नमुना तयार झाला आहे. प्रशिक्षित ३०० महिलांनी राबवलेल्या वर्तनबदल मोहिमेमुळे ७.५ लाख नागरिकांना स्वच्छतेचे शिक्षण मिळाले. यामुळे नागरिकांच्या सवयी, वापर आणि आरोग्य-जाणीवेत सकारात्मक बदल घडला. 'सुविधा केंद्रां'मुळे जठरांत्र, अतिसार आणि मूत्रमार्गाच्या संक्रमणात ५० टक्के घट झाली आहे. झोपडपट्टी क्षेत्रातील सर्वाधिक समस्या असलेल्या दूषित पाणी व अस्वच्छतेमुळे होणारे आजार आता लक्षणीयरित्या कमी झाले आहेत. सुरुवातीपासून ९ महिन्यांत केंद्र स्वतःचा खर्च भागवू लागते ही या योजनेची मोठी ताकद आहे. आज मुंबईतील सर्व २३ केंद्रे पूर्णपणे स्वयं-टिकाऊ आहेत.

# महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाच्या योजनांसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळ मर्यादित, जिल्हा कार्यालय मुंबई शहर/उपनगर मार्फत २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी महामंडळाच्या विविध योजनांकरिता कर्ज प्रस्ताव महादिशा पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन महामंडळाचे मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध बांधवांच्या स्वयंरोजगार, आर्थिक सक्षमीकरण आणि सामाजिक उन्नतीसाठी राबविल्या जाणाऱ्या योजनांच्या अंमलबजावणीसाठी केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री अनुसूचित जाती अभ्युदय योजना (पीएम-एजेएवाय) अंतर्गत ही अर्ज प्रक्रिया राबविण्यात येत आहे. रोजगाराच्या संधी निर्माण करून जीवनमान उंचावणे हा या योजनांचा मुख्य उद्देश असल्याचे महामंडळाने स्पष्ट केले आहे. अर्जाची संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक आणि पूर्णपणे ऑनलाईन स्वरूपात होणार असून इच्छुक लाभार्थ्यांनी आपले अर्ज https://mpbcdc.maharashtra.gov.in या संकेतस्थळांवर करावेत. अर्ज करताना आवश्यक कागदपत्रे स्कॅन करून पोर्टलवर अपलोड करणे बंधनकारक आहे. प्रत्यक्ष कार्यालयात कोणतेही अर्ज स्वीकारले जाणार नाहीत, असेही प्रसिद्धी पत्रकात नमूद करण्यात आले आहे.

अर्ज करण्यास आवश्यक पात्रता

अर्जदार अनुसूचित जाती व नवबौद्ध संवर्गातील असावा व त्याचे वय १८ ते ५० वर्षे असावे. वार्षिक उत्पन्न मर्यादा ग्रामीण व शहरी तीन लाख रुपये आहे. अर्जदार हा या महामंडळाच्या योजनांचा व इतर वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा.

अर्ज करण्यास आवश्यक कागदपत्रे

जातीचा व उत्पन्नाचा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेल्या दाखला. पाच पासपोर्ट आकाराचे फोटो, रेशनकार्ड, मतदान ओळखपत्र, रहिवासी प्रमाणपत्र, आधारकार्ड, पॅन कार्ड ची प्रत.

कोटेशन व व्यवसायासाठी आवश्यक असलेल्या जागेचा पुरावा, व्यवसायानुसार इतर दाखले, आवश्यकतेप्रमाणे प्रकल्प अहवाल, बँक खाते क्रमांक, पासबुकची झेरॉक्स प्रत आवश्यक आहे.

## औसा नगरपरिषद राष्ट्रवादीच्या ताब्यात द्या विकासाची जबाबदारी मी घेतो : उपमुख्यमंत्री अजित पवार

(पान १ वरून..)

राष्ट्रवादी काँग्रेसच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार परवीन नवबोद्दीन शेख यांच्यासह २३ उमेदवारांना भरघोस मताने विजयी करा असे आवाहन त्यांनी केले.

सभेच्या प्रारंभी डॉ. अफसर शेख यांनी प्रास्ताविकातून आपण केलेल्या कामाची माहिती सांगितली. माजी मंत्री तथा उदगीरचे आमदार संजय बनसोडे, सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचेही भाषणे झाली. या विराट सभेच्या व्यासपीठावर शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे, पदवीधर मतदारसंघाचे आमदार सतीश चव्हाण, मकरंद सावे, अँडव्होकेट श्रीकांत सूर्यवंशी, दत्तात्रय कोळपे, बबन भोसले, नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार परविन शेख, मौलाना कलीमुल्ला, जावेद शेख, खुंदमीर मुल्ला,मुजाहेद शेख,मेहरज शेख अविनाश टिके, गोविंद जाधव,अमर रेड्डे, मुकेश तोवर, रुपेश दुधनकर, किर्ती ताई कांबळे,वैशाली नारायणकर यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी अनेकांनी कार्यकर्त्यांनी राष्ट्रवादीत कॉंग्रेस पक्षात जाहिर प्रवेश केला.

# १० हजार महिला कामगारांचा सोलापूर ते मंत्रालय पायी मोर्चा धडकणार

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

सोलापूर : सेंटर ऑफ इंडियन ट्रेड युनियन्सचे १७ वे सोलापूर जिल्हा अधिवेशन लाल बावटा कार्यालय, दत्तनगर येथे उत्साहात पार पडले. अधिवेशनाची सुरुवात कॉ नरसय्या आडम मास्तर यांच्या हस्ते ध्वजारोहणाने झाली.

अधिवेशनाचे उद्घाटन राज्य उखढण नेते व जिल्हा प्रभारी कॉ. वसंत पवार यांनी केले. आपल्या भाषणात त्यांनी केंद्र सरकारने २९ विविध कामगार कायद्यांचे चार श्रम संहितांमध्ये केलेले रूपांतर हे कामगार-विरोधी पाऊल असल्याचा आरोप केला.

ते म्हणाले, नवीन श्रम संहितांत लेबर कोर्ट व लेबर ऑफिसची संकल्पनाच संपवण्यात आली आहे. ६० टक्क्यांहून अधिक असंघटित कामगारांवर या कायद्यांचा गंभीर परिणाम




होणार आहे. कामगारांनी एकजुटीने या धोरणांविरोधात उभे राहणे अत्यंत आवश्यक आहे.

ते पुढे म्हणाले की असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा व पेन्शन देण्यासाठी उखढणने सातत्याने लढा दिला असून कामगारांच्या निवाऱ्याचे स्वप्न साकार करण्यातही संघटना यशस्वी ठरली आहे. २६ नोव्हेंबर रोजी चार श्रम संहितांविरोधात देशभरात कामगार संघटना रस्त्यावर उतरणार असल्याची त्यांनी घोषणा केली.

अधिवेशनाचा अहवाल आणि कार्यवाही

उखढण जिल्हा सचिव ॲड. एम.एच. शेख यांनी मागील तीन वर्षांचा राजकीय व संघटनात्मक अहवाल सादर केला. २५ प्रतिनिधींनी चर्चेत सहभाग घेतला. जिल्हा कोषाध्यक्ष कॉ. दीपक निकंबे यांनी आर्थिक अहवाल मांडला. अहवाल सर्वानुमते मंजूर करण्यात आला. शोकप्रस्ताव कॉ. विल्यम ससाणे यांनी मांडला.

कॉ नरसय्या आडम मास्तर, कॉ.व्यंकटेश कोंगारी,युसुफ शेख मेजर,नसीमा शेख, नलिनी ताई कलबुर्गी आदींनी अध्यक्षीय मंडळाचे काम पाहिले.

वृत्तांत लेखन समितीत दत्ता चव्हाण आणि किशोर मेहता यांनी काम पाहिले.

अधिवेशनात २१ सदस्यीय पदाधिकारी कमिटी व ६१ सदस्यीय जिल्हा कार्यकारिणीची निवड करण्यात आली.

मुख्य पदाधिकारी पुढीलप्रमाणे: जिल्हाध्यक्ष: कॉ. नरसय्या आडम (मास्तर),. जिल्हा सचिव: ॲड. एम.एच. शेख, जिल्हा कोषाध्यक्ष: कॉ. दीपक निकंबे

**कॉ. आडम मास्तर यांची घोषणा; सीटू चे १७ वे सोलापूर जिल्हा अधिवेशन उत्साहात**

उपाध्यक्ष: कॉ. नलिनी कलबुर्गी, कॉ. व्यंकटेश कोंगारी, कॉ. कामिनी आडम, कॉ. नसीमा शेख, कॉ. सुनंदा बल्ला, कॉ. शकुंतला पाणीभाते, कॉ. फातिमा बेग, कॉ. बापू साबळे, कॉ. दाऊद शेख

सहसचिव: कॉ. युसूफ शेख (मेजर), कॉ. किशोर मेहता, कॉ. विल्यम ससाणे, कॉ. नरेश दुगाणे, कॉ. विरेंद्र पद्मा, कॉ. वसीम मुल्ला, कॉ. पुष्पा पाटील, कॉ. विक्रम (मुन्ना) कलबुर्गी, कॉ. मुरलीधर सुंचू

समारोपीय भाषणात जिल्हाध्यक्ष कॉ. नरसय्या आडम (मास्तर) यांनी अत्यंत महत्वाची घोषणा केली. ते म्हणाले, विडी कामगारांना किमान वेतन ४०२ रुपये, १० हजार रुपये पेन्शन, रोख मजुरी, तसेच कॉ. गोदूताई परुळेकर वसाहतीतील मूलभूत सुविधा उपलब्ध व्हाव्यात यासाठी १० हजार महिला कामगारांचा सोलापूर ते मंत्रालय (मुंबई) असा पायी मोर्चा १४ एप्रिल २०२६ रोजी काढण्यात येईल.

सरकार कामगारांना गुलाम बनवणारे नवे कायदे आणत आहे आणि सार्वजनिक उद्योगांचे खासगीकरण करून भांडवलदारांना लाभ देत असल्याचा आरोप करत त्यांनी कठोर संघर्षाची हाक दिली.

**अधिवेशनात मंजूर झालेले ८ ठराव**

१. विडी कामगारांचे सुधारित किमान वेतन रु. ४०२ फरकासहित अदा करा व निवृत्त कामगारांना रु. १०,००० पेन्शन द्या. २. यंत्रमाग उद्योगातील कामगारांसाठी कामगार कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी करा. ३. असंघटित कामगारांना सामाजिक सुरक्षा लागू करा. ४. जन सुरक्षा कायदा रद्द करा. ५. शहराला दररोज पाणीपुरवठा करा. ६. योजना कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत सामावून घ्या व किमान वेतन लागू करा. ७. कॉ. गोदूताई परुळेकर वसाहतीतील पायाभूत सुविधा उपलब्ध करा. ८. नवीन रे नगर परिसरात रोजगार उपलब्धतेसाठी प्रयत्न करा.

हे वृत्तपत्र मालक, सिद्धार्थ सोशल फौंडेशन यांनी मुद्रक, प्रकाशक, संपादक कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे यांच्या सम्यक पब्लिकेशन अँड प्रिंटर्स २४७, बुद्ध विहार, रमाबाई आंबेडकर नगर, बुधवार पेठ, सोलापूर ४१३००२ महाराष्ट्र येथे छापून मु. पो. गोगांव ता. अक्कलकोट जि. सोलापूर ४१३२१८ महाराष्ट्र येथे प्रकाशित केले. **संपादक : कमलाकर ज्ञानदेव सोनकांबळे** ई-मेल - yashsiddhinews@gmail.com www.yashsiddhinews.com Mo. 9921988358

This Newspaper is printed by the Owner Shidharth Social Foundation, Printer, Publisher, Editor Kamalakar Dayndev Sonakamble at Samyak Publications and Printers 247, Budha Vihar, Ramabai Ambedkar Nagar, Budhwar Peth Solapur-413002 (Maharashtra), Published, at Gogaon Tal Akkalkot Dist Solapur 413218 (Maharashtra). Editor : Kamalakar Dayndev Sonakamble

■ **प्रशासकीय कार्यालय** : सम्यक उद्योग समूह, पृथ्वी एंटरप्राइजेस, सर्वे नं. ६५९/८, शॉप नं. ४, राजीव गांधी नगर, न्यू अप्पर बस स्टॉप, बिबवेवाडी पुणे-३७ ■ **विभागीय कार्यालय** : प्रबुद्ध इंटरप्राइजेस, दुकान नं. २ अमरधान चौक, खेमानी उल्हासनगर ४२१००२

# नळदुर्ग शहराच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करा




## राष्ट्रवादीचे ना. अजित दादा पवार यांचे नळदुर्गकरांना आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/एस.के. गायकवाड : नगर परिषदेची ही निवडणूक नळदुर्ग शहराच्या विकासाची दिशा ठरविणारीअसून बारामती, पिंपरी चिचवड पुणे शहराच्या धरतीवर नळदुर्गाच्या सर्वांगीण विकासाला चालना देण्यासाठी नळदुर्ग शहरातील समस्यांची जाणीव असलेले राष्ट्रवादी काँग्रेसचे उमेदवार संजय अण्णा बताले यांना व सर्व प्रभागातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांना विजयी करा असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष तथा राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार अजित दादा पवार यांनी येथे बोलताना केले.

नळदुर्ग नगर परिषदेच्या सार्वत्रिक निवडणुकीच्या प्रचाराचा शुभारंभ राष्ट्रवादी काँग्रेसने नामदार अजित दादा पवार यांच्या प्रचंड जाहीर सभेने केला.

या प्रसंगी नामदार अजित दादा पवार हे बोलत होते पुढे बोलताना ते म्हणाले की राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा शिव फुले शाहू आंबेडकर आदी महामानवांच्या विचारधारेवर सर्व जाती धर्मातील लोकांना सोबत घेऊन काम करणारा पक्ष असून शहरातील अंतर्गत भूमिगत गटार रस्ते पाणी विज अशा जनतेच्या जिव्हाळ्याच्या प्रश्न सोडवण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेस कटिबद्ध असून शहराच्या विकास कामाला निधी कमी पडू देणार नाही.नळदुर्ग शहराला लाभलेल्या पर्यटन स्थळाचा विकास करून येथील बेरोजगार तरुणांना रोजगार उपलब्ध करून देणार तुळजापूर तीर्थक्षेत्र नळदुर्ग पर्यटन स्थळ याची सांगड घालून विकास कामाला गती देऊन नळदुर्गचा कायापालट करणार मराठवाड्यातील शेतकऱ्यांना न्याय देण्याचा प्रयत्न करणार काही झाले तरी लाडकी बहीण योजना बंद पडू देणार नाही असे ते म्हणाले तर राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित दादा पवार गटाचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संजय बताले म्हणाले की नामदार अजित दादा पवार यांच्या नेतृत्वाखाली आणि मार्गदर्शन खाली नळदुर्ग शहरातील सर्वसामान्य जनतेच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी मी सातत्याने प्रयत्न करणार असून ही लढाई धनशक्तीच्या विरोधात जनशक्तीची आहे त्यामुळे पैशाच्या जोरावर सत्ता ताब्यात घेण्याचे स्वप्न पाहणाऱ्यांना जनतेने आमच्या सर्वच्या सर्व उमेदवाराना विजय करून जनशक्तीला विजयी करा.

या प्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेस अजित दादा पवार गटाचे नेते सुरेश दाजी बिराजदार, शिक्षक मतदार संघाचे आमदार विक्रम काळे, भूम - परंडा मतदार संघाचे आमदार राहुल मोठे,गोकूळ तात्या शिंदे, धाराशिव जिल्हा अध्यक्ष महेंद्र काका धुरगुडे, शफीभाई शेख,मुस्ताक कुरेशी, रिपाइंचे जिल्हा उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे, महादेव कांबळे, प्रमोद कुलकर्णी,संभाती कांबळे मारुती वाघमारे सह सर्व उमेदवार,महिला, नागरिक, युवा कार्यकर्ते मोठ्या संख्येनने उपस्थित होते

## तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा प्रचाराचा शुभारंभ श्री संत नामदेव पायरी श्री संत चोखामेळा दर्शन घेऊन करण्यात आला

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : यावेळी नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार डॉ. प्रणिती भालके, तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे नेते वसंत नाना देशमुख, अनिल सावंत, नागेश भोसले, मनसे नेते दिलीप धोत्रे, भगीरथ भालके, माजी नगरसेवक धुमाळ, किरण घाडगे, पंढरपूर शहर व तालुक्यातील आघाडीचे ३६ उमेदवार व तसेच कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पंढरपूर नगरपालिकेच्या निवडणुकीसाठी प्रचाराचा शुभारंभ तीर्थक्षेत्र विकास आघाडीचा प्रचाराचा शुभारंभ श्री संत नामदेव पायरी व श्री संत चोखामेळा यांचे दर्शन घेऊन करण्यात आला.


स्वच्छ व सुंदर पंढरपूर व खड्डे मुक्त पंढरपूर अशी संकल्पना घेऊन विरोधकाचा मुद्दा प्रचाराचा करत आहेत. प्रचारफेरी माधवा चौक कालिकादेवी चौक, चोफाळा, शिवाजी चौक, प्रचाराचा सांगता समारंभ महात्मा फुले चौक येथे करण्यात आला.

यावेळी बोलताना भगीरथ भालके म्हणाले की गेले ४० वर्ष सत्ता असताना त्यांनी पंढरपूरचा कोणत्याही प्रकारचा विकास केलेला नाही फक्त ठेकेदारी व ठेकेदारांना जगवणे हेच काम केले आहे त्यांनी कोणत्याही प्रकारचा शहरातील म्हणाव तसा विकास केलेला नाही .

पंढरपुरात खड्डे मुक्त व दोन मुक्त करण्यासाठी स्वतः आमच्या हाती द्यावी असे आव्हान त्यांनी केले आहे. मनसे नेते दिलीप धोत्रे यांनी सांगितले की तीर्थ शतक विकास आघाडीमध्ये कोणतेही मतभेद नाहीत. विकासाला बौद्ध आम्ही सर्व मिळून विकास करू असे आव्हान केले. पुढच्या रस्त्याची व चंद्रभागेची दैन्य अवस्था झाली आहे याला सत्ताधारी जबाबदारी याच्याकडे दुर्लक्ष आहे. हे काय मिळवणे व ठेकेदार जगवणे अशा प्रकारचे काम सत्ताधाऱ्यांचे आहे. यावेळी नागेश भोसले यांनीही भाषण केली. पंढरपूर शहरातील तीर्थक्षेत्र विकास आघाडीचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते व तीर्थक्षेत्र विकास आघाडीच्या प्रचार फेरीमध्ये शक्ती प्रदर्शन मोठ्या प्रमाणात करण्यात आले.

## पंढरपूर नगरपरिषदेसाठी दुसऱ्या दिवशी १७ अर्ज माघारी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



पंढरपूर : पंढरपूर नगरपरिषदेसाठी अर्ज माघारी घेण्याच्या दुसऱ्या दिवशी १७ नगरसेवक पदाच्या मेदवारांनी अर्ज माघारी घेतलेआहेत. अशी माहिती सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी महेश रोकडे यांनी दिली.

पंढरपूर नगरपरिषदेच्या ३६ नगरसेवक पदासाठी व एक नगराध्यक्षपदासाठी निवडणूक होत आहे. नगराध्यक्षपदासाठी ८ उमेदवारी अर्ज दाखल आहेत. तर नगरसेवक पदासाठी ३६६ अर्ज दाखल झाले होते. यात नगराध्यक्षपदासाठी ७ तर नगरसेवक पदासाठी ३२३ उमेदवारी अर्ज वैध ठरले आहेत. उमेदवारी वैध ठरलेल्या उमेदवारांना अर्ज माघार घेण्यासाठी दि.२१ नोव्हेंबरपर्यंत वेळ देण्यात आला आहे. त्यामुळे अर्ज माघार घेण्याच्या पहिल्या दिवशी म्हणजेच बुधवार दि. १९ रोजी एकह अर्ज माघारी घेण्यात आला नाही. मात्र, दुसऱ्या दिवशी गुरुवार दि.२० रोजी १७ उमेदवारांनी अर्ज माघारी घेतले आहेत. शुक्रवार दि.२१ नोव्हेंबर रोजी अर्ज माघार देण्याचा शेवटचा दिवस आहे.

यांनी घेतले अर्ज माघारी

प्रभाग क्र.२ ब मधून श्रीनिवास धनंजय बोरगावकर अपक्ष, अश्विनी श्रीनिवास बोरगावकर अपक्ष, प्रभाग क्र.९ ब मधून राजु शमशुद्दीन सत्तारमेकर अपक्ष, जावेद काशिम शेख अपक्ष, सुनिल मोहन अधटराव अपक्ष, प्रभाग क्र.१३ अ मधून रुक्मिणी धनाजी धोत्रे अपक्ष, प्रभाग क्र.१३ ब मधून राजन बळीराम थोरात अपक्ष, प्रभाग क्र.१४ अ मधून शैलजा बाळासाहेब कसबे अपक्ष, प्रतिक्षा ऋषिकेश भालेराव अपक्ष दोन अर्ज, प्रभाग क्र. १४ ब मधून विजय परमेश्वर वरपे अपक्ष, तुळजाराम माणिक धोत्रे अपक्ष, प्रभाग क्र. १७ अ मधून प्रसाद श्रीमंत यादव अपक्ष, उमेश भगवान सर्वगोड अपक्ष, अंबालाल किसन दोडिया अपक्ष, प्रभाग क्र.१७ ब मधून उमा संजय घोडके विठ्ठल परिवर्तन विकास आघाडी, उमा संजय घोडके अपक्ष यांनी उमेदवारी अर्ज माघारी घेतले आहेत.

## नैताळे येथे के. के. वाघ संस्थेमार्फत आरोग्य तपासणी शिबिर संपन्न

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**



निफाड/प्रतिनिधी : के.के. वाघ शिक्षण संस्था, के के वाघ फाउंडेशन बाळासाहेब वाघ वेलफेअर फाउंडेशन आणि स्माईल व स्पिनॅच यांच्या संयुक्त विद्यमाने कै. बाळासाहेब वाघ यांच्या स्मृतीपित्यर्थ निफाड तालुक्यातील नैताळे येथे आरोग्य तपासणी शिबिर आयोजित करण्यात आले होते .या प्रसंगी केदु नाना बोरगुडे, बोरगुडे गुरुजी, माजी सरपंच राजेंद्र बोरगुडे, उपसरपंच मोतीराम भवर, चेअरमन सर्जेरावजी बोरगुडे, रामदास वाढवणे यांच्या हस्ते शिबिराचे दिप प्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी गावातील स्कूल कमिटी अध्यक्ष नितीन बोरगुडे, स्कूल कमिटी उपाध्यक्ष दत्ताजी भवर, शिवाभाऊ बोरगुडे, ज्ञानेश्वर घायाळ, प्रतीक घायाळ, योगेश बोरगुडे, सोमनाथ पडोळ, नंदू पडोळ, दिगंबर आहेर,धोंडीरामजी दाते, अजितजी गाजरे, देशदूत वार्ताहर संजय साठे, जयराम पडोळ, वैभव कुशारे,खंडेराव सोनवणे, सुरेश दादा भोज, रामनाथ पानगव्हाणे आदी उपस्थित होते.

आरोग्य तपासणी मनी शंकर आय हॉस्पिटल, नाशिक चे डॉ. रघुनाथ खांडबहाले, डॉ.मंजुषा चव्हाण, मोहिनी गायकवाड, आत्माराम चौधरी, अभिजीत ताजने व रेखा पाटील तर श्री साईबाबा हार्ट इन्स्टिट्यूट चे डॉ.कुणाल निकम डॉ. राहुल नाईक, डॉ.जयेश रेलन व कल्पेश वाळके तसेच एच.सी.जी.मानवता कॅन्सर सेंटरचे डॉ काजल गुरुबानी, योगेश साबळे, मंगला गांगुर्डे, सलीना शेख या सर्व टीमने उपस्थित रुग्णांची तपासणी केली. सदर शिबिर हे के. के. वाघ शिक्षण संस्थेचे अध्यक्ष समीर दादा वाघ,विश्वस्त श्रीमती शकुंतलाताई वाघ, सचिव के. एस.बंदी, संचालक जन संपर्क विभाग , अजिंक्य दादा वाघ, विश्वस्त व समन्वयक डॉ व्हि. एम. सेवलीकर, समन्वयक डॉ.बी. व्ही. कर्डिले, समन्वयक डॉ. एन. एस. पाटील यांच्या प्रेरणेतून घेण्यात आले. या शिबिरात एकूण ५५४ नागरिकांची आरोग्य तपासणी करून घेतले असून .त्यात महिला नेत्र २४२ हृदय २११ कॅन्सर १०१अशी तपासणी. सूत्रसंचालन प्रा. किरण वाघ यांनी केले तर आभार प्राचार्य डॉ. वैभव भामरे मानले. हे शिबिर यशस्वी करण्यासाठी के. के. वाघ वरिष्ठ महाविद्यालय चांदोरीचे प्राचार्य डॉ.माधव देवरे के. के. वाघ इंग्लिश स्कूलच्या मुख्याध्यापिका श्रीमती वंदना पवार, के. के.वाघ इन्स्टिट्यूट ऑफ फार्मसीचे प्राचार्य डॉ वैभव भामरे, के. के. वाघ विद्या भवनचे प्राचार्य दिनकर शेजवळ, के. के. वाघ गीताई वाघचे प्राचार्य श्रीमती उज्वला तासकर, तसेच के. के. वाघ युनिव्हर्सल स्कूल सी.बी.एस.सी चे मुख्याध्यापक बाळासाहेब मुंडे,सर्व प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी या सर्वांनी शिबिर यशस्वी होण्यासाठी परिश्रम घेतले.




## महाविकास आघाडीच्या उमेदवाराला कशाच्या भरवशावर मत देणार: पालकमंत्री जयकुमार गोरे

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : स्थानिक स्वराज्य संस्थेच्या महाविकास आघाडीतील तिन्ही पक्षाची अवस्था बिकट असून त्यांना नगरपालिकेत उमेदवार उभा करायला सापडले नाही.

स्थानिक स्वराज्य संस्थेत महाविकास आघाडीतील मंगळवेढा नगरपालिकेत उभा करायला उमेदवार सापडली नाहीत. लोकांना मते देऊन काय करणार असे ग्रामविकास मंत्री तथा सोलापूर जिल्ह्यातील पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी मंगळवेढा येथे बोलताना सांगितले. अध्यक्षस्थानी आमदार समाधान आवताडे हे होते यावेळी बोलताना मंगळवेढा स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत कमळ चिन्हाचा उमेदवार व तुतारीची अवस्था अतिशय बिकट असून त्यांना उभा करायला उमेदवार मिळाला नाही अशी अवस्था काँग्रेसची आहे.

**माढा शहरात कृषी व सांस्कृतिक महोत्सवाचे आयोजन**

**महाराष्ट्राचे हास्यवीर भाऊ कदम, आनंद शिंदे, निलेश साबळेंची उपस्थिती**

## माढ्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजांच्या स्मारकासाठी आ. अभिजीत पाटील यांच्याकडून अकरा लाख वर्गणी

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

पंढरपूर/प्रतिनिधी : मतदारसंघाच्या विकासाची जी व्हिजन समोर ठेवले आहे. त्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. आमदारांचे काम म्हणजे निधी आणि आमदार फंड इतकाच मर्यादित न मानता गेल्या एक वर्षाच्या कारकीर्दीत राज्यातील अनेक प्रश्न विधानसभेत उपस्थित केली, विधानसभेत कोणतेही वक्तव्य केले तर ते पटलावर येते. त्याचा पाठपुरावा केल्यास ते प्रश्न सुटतात तसेच सामान्यचे प्रश्न सोडवण्यासाठी आपण गेले एक वर्षाच्या कार्यकाळात काम केले असल्याचे मत आमदार अभिजीत पाटील यांनी व्यक्त केले.

विठ्ठल प्रतिष्ठान यांच्यावतीने माढा शहरात आयोजित कृषी व सांस्कृतिक महोत्सवात ते बोलत होते आमदार अभिजीत पाटील पुढे म्हणाले मतदारसंघातील लोकांनी विधानसभेत जाण्याची संधी दिली. विधानसभेत अधिवेशनात मी प्रत्येक दिवशी हजर राहिलो. प्रत्येक दिवशी शिकायला मिळाले. तारांकित प्रश्न, अंतरांकित प्रश्न, लक्षवेधी, अवचित त्यांचा मुद्दा, २९३ वर चर्चा, २९२ काय आहे, ९४ वरची चर्चा, १०१ काय आहे, या सगळ्या गोष्टी शिकायला मिळाल्या.

> **मी यशवंतराव यांच्या विचाराचा पाईक**
>
> **काम करताना मी यशवंतराव चव्हाण यांना डोळ्यासमोर ठेवून काम करतो. शेती करायची असल्यास शेतात जा व शेती तुम्हाला शेती करायला शिकवेल. तसेच समाजकार्य करायचे असल्यास समाजात जा समाज समाज कार्य करायला शिकवीन, लोकहिताचे समाजात चर्चा करा त्यातून तुम्हाला लोकांचे प्रश्न समजतील या सर्वातून राजकारण करायला शिकलो यशवंतराव चव्हाण यांचा संदर्भ देत अभिजीत पाटील यांनी वक्तव्य केल्याने त्यांच्या या पुढील राजकीय वाटचालीची दिशा स्पष्ट झाली आहे.**





विधानसभेत सामान्याशी निगडित एसटी पार्सल दुधामधील भेसळ, ऑनलाइन गेम, यावरचे प्रश्न विचारले ते सर्व प्रश्न मार्गी लागले हे सामान्य जनतेचे प्रश्न होते, मी आमदार होण्यापूर्वी आमदारांची काम म्हणजे निधी व आमदार फंड इतकेच होते पण मी नुसता माढा विधानसभेचा आमदार नसून राज्याच्या विधानसभेतील लोकांचे प्रतिनिधी म्हणून सामान्यचे प्रश्न उपस्थित करण्याचे काम केले निवडणूक लढवताना जे विजन लोकांसमोर ठेवले त्याच्याबरोबर काम करणे सुरू असून काही कामे अंतिम टप्प्यात आले आहेत त्यापैकी माढा शहरात भव्य शिवस्मारक उभारणीसाठी जागेची मोजणी झाली स्मारकासाठी दहा कोटींचा निधी मागणी केला असून यापैकी एक कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला आहे हा सर्व निधी सुशोभीकरणासाठी व स्मारकासाठी असून छत्रपती शिवाजी महाराजांचा अश्वारूढ पुतळा उभारण्यासाठी एक समिती गठीत केल्या असून त्यासाठी अकरा लाख रुपये ची देणगी मी स्वतः देणार असून सर्वांनी एक कामी सहकार्य करण्याची आव्हान त्यांनी केले.

महापूर व अतिवृष्टी मुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले असून तालुक्यातील एक लाख चार हजार शेतकऱ्यांपैकी ९८ हजार शेतकरी हे आर्थिकदृष्ट्या लाभासाठी पाठ्य ठरले आहेत. या कामे प्रशासकीय यंत्रणेच्या पाठीशी खंबीरपणे आपण उभा राहण्याची भूमिका घेतली मतदारसंघातील अनेक लोकांना वैद्यकीय मदत उपलब्ध करून दिली आहे त्याची सोबत असले पाहिजे ही माझी प्रामुख्याने भूमिका करायची आहे.

सलग चार दिवस माढा कृषी व सांस्कृतिक महोत्सवाच्या माध्यमातून महाराष्ट्राचे हास्यविर भाऊ कदम महानायक आनंद शिंदे व प्रबोधन डॉक्टर निलेश साबळे अशा महाराष्ट्रातील दिग्गज कलाकारांना माढा नगरीत आणून आमदार अभिजीत पाटील यांनी माढा मतदारसंघातील नागरिकांची मने जिंकले आहेत. दरवर्षी माढा फेस्टिवल करण्याचे आमदार अमित पाटील यांनी नमूद केली.

# सत्ता हाती द्या नळदुर्ग शहरांचे बारामती करू : अजित पवार




## लाडक्या बहिणीना सुद्धा दिलासा; जे मी बोलतो ते करतो

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

नळदुर्ग/दादासाहेब बनसोडे : नळदुर्ग शहर एक ऐतिहासिक शहर म्हणून ओळखले या शहराचा काया पालट करायचा आहे परंतु नळदुर्ग शहरातील नागरीकांनी ऐतिहासिक दृष्ट्या पक्षाला सक्षम करण्यासाठी तुम्हाला शहरात विविध ठिकाणी विकास पाहिजे आसेल तर राष्ट्रवादी काँग्रेसच्या पाठीमागे खंबीर पणे उभे राहुन साथ दयाल ही आपेक्षा करतो नळदुर्ग शहर कमी लोक संख्येचे गाव आहे मी बारामतीचा चेहरा मोहरा बदलतो मग नळदुर्ग शहराचा का नाही आसे मत महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी केले.

ते पुढे म्हणाले, नळदुर्ग सारख्या ऐतिहासिक शहरांमध्ये तहसील कार्यालय आहे त्यामध्ये कर्मचारी कमी आहेत पर्यटनासाठी ऐतिहासिक किल्ला आहे विविध मंदीरे आहेत दर्गा आहे या सर्व गोष्टी लक्षात घेऊन त्या पुर्ण करू नगरपालिका स्वच्छ आणि सुंदर करण्यासाठी नगर परिषदे मध्ये पारदर्शकता आणण्यासाठी राष्ट्रवादी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार संजयजी बताले आणि त्यांच्या पूर्ण टीमला निवडून द्या नगर परिषदेची सत्ता हाती द्या कारण बारामती शहर पाहिले खूप मोठ्या प्रमाणात बदल झालेला आहे हा बदल घडवायचा असेल तर नळदुर्ग सुद्धा बारामती आपण करूया . काही विरोधक लाडकी बहीण योजनेचे पैसे बंद होणार असा महाचर्चा होत असताना कुठल्याही प्रकारची योजना सरकार बंद करणार नाही जे योजना आहेत त्या योजना पूर्ण चालू राहणार आहेत शिवाय बेरोजगारांच्या हाताला काम उपलब्ध करून देण्यासाठी आम्ही एम आय डी सी चा प्रस्ताव घेऊन कामाला लागतोय शहराला एमआयडीसी होईल विविध योजना येतील मी जे बोलतो ते करतो असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी केले

नळद शहरात नुकताच नळदुर्ग नगर परिषदेची सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या प्रचार सभेप्रसंगी ते नागरिकांना संबोधित होते कार्यक्रम ाची प्रास्ताविक राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार गट नेते शपीभाई शेख यांनी केले यावेळी नळदृग नगर परिषद मध्ये होऊ घातलेल्या सार्वत्रिक निवडणूक २०२५ चे राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट यांचे नगराध्यक्ष पदाचे उमेदवार संजय बताले त्याचबरोबर नळदृग नगरी-चे माजी नगराध्यक्ष तथा विद्यमान उमेदवार मुस्ताक कुरेशी रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया उस्मानाबाद जिल्ह्याचे उपाध्यक्ष बाबासाहेब बनसोडे व नरवडे ताई यांनी आ-पले मनोगत व्यक्त केले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे गोकुळ तात्या शिंदे उमेदवार रमेश पिस्के, संगीता कांबळे, उमेदवार खालीद शेख, उमेदवार प्रियांका योगेश सुरवसे, उमेदवार महाबोले यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे अजित पवार गटाचे सर्व उमेदवार नगर नगराध्यक्ष पदाचे संजय बताले व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नुकताच राष्ट्रवादी काँग्रेस अजित पवार गट पक्षात प्रवेश करून युवा शहराध्यक्षपदी निवड करण्यात आली ते प्रमोद कुलकर्णी यांनी केले कार्यक्रमाला नळदुर्ग शहरातील तमाम नागरिक उपस्थित होते रेकॉर्डब्रेक सभा झाल्यामुळे गावात चर्चेचा विषय बनला आहे.

# वाहुळी येथे ८ फूट लांबीचा अजगर आढळून आल्याने खळबळ; सर्पमित्रांकडून सुरक्षित बचाव

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

ठाणे प्रतिनिधी/मिलिंद जाधव

भिवंडी तालुक्यातील पडघा परिसरातील वाहुळी येथे तब्बल ८ ते ९ फूट लांबीचा आणि अंदाजे १५ ते १६ किलो वजनाचा अजगर आढळून आल्याने एकच खळबळ उडाली. रात्री नऊच्या सुमारास हायवेच्या कडेला मोठा सर्प दिसल्याची माहिती मिळताच स्थानिकांनी सर्पमित्रांना पा-चारण केले. तत्काळ धाव घेऊन सर्पमित्र आकाश जाधव यांनी ही घटना पडघ्यातील सर्पमित्र सूरज गायसमुद्रे व रवी दांडगे यांना कळवली. माहिती मिळताच सर्पमित्र घटनास्थळी दाखल झाले. निरीक्षणात हा सर्प अजगर प्रजातीचा असल्याचे स्पष्ट झाले. सर्पमित्रांनी कोणतीही हानी न पोहा-चवता अत्यंत संवेदनशीलतेने आणि दक्षतेने अजगराला सुरक्षितरीत्या पकडले. आपल्या भक्ष्याच्या शोधात हा अजगर रस्त्याच्या



कडेला फिरत असावा,असा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात आला आहे. यानंतर सर्पमित्र सूरज गायसमुद्रे, रवी दांडगे , मयुर बजागे यांनी पडघा वनपरिक्षेत्रातील अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली त्या अज-गराला सुरक्षित जंगलात सुखरूप सोडून दिले. या कार्यात वडपा वनपाल दर्शन मुरकुटे आणि वनरक्षक मोनिका बेलदार यांचे विशेष मार्गदर्शन मिळाले. बिनविषारी अजगराला सुरक्षितरित्या नैसर्गिक अधिवासात परत सोडल्याने गावकऱ्यांनी दिलासा व्यक्त केला असून सर्पमित्रांच्या पर्यावरणपूरक आणि संवेदनशील कृतीचे सर्वत्र कौतुक होत आहे. पर्यावरणप्रेमी हे कार्य वन्यजीव संवर्धनाचा उत्कृष्ट आदर्श असल्याचे सांगत सर्पमित्रांचे अभिनंदन करत आहेत.

# हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळाच्या योजनांचा लाभ घेण्याचे आवाहन

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : हिंदू खाटीक समाज आर्थिक विकास महामंडळ मर्यादित (महात्मा फुले मागासवर्ग विकास महामंडळाची उपकंपनी) मार्फत अर्जदारास व्यवसाय सुरू करण्यासाठी अनुदान योजना, बीज भांडवल योजना, थेट कर्ज योजना व एनएसएफडीसी योजना राबविण्यात येत आहे. २०२५-२६ या आर्थिक वर्षाचे उद्दिष्ट साध्य करण्यासाठी अनुसूचित जातीमधील हिंदू खाटीक या प्रवर्गामधील लाभार्थ्यांनी या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहन महामंडळाचे मुंबई शहर व उपनगर जिल्ह्याचे जिल्हा व्यवस्थापक यांनी केले आहे.

अनुदान योजना - या योज-नेची प्रकल्प मर्यादा ५० हजार रुपये असून प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किवा जास्तीत जास्त २५ हजारपर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरित रक्कम बँकेमार्फत देण्यात येते. बँक कर्जावर बँकेच्या नियम ाप्रमाणे व्याज आकारण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे तीन वर्षात करावयाची आहे.

बीज भांडवल योजना - या योजनेची प्रकल्प मर्यादा ५०,००१ ते ५ लाखापर्यंत असून प्रकल्प मर्यादेच्या २० टक्के बीज भांडवल कर्ज महामंडळामार्फत चार टक्के द. सा. द. शे. व्याजदराने देण्यात येते. सदर राशीमध्ये महामंडळाचे अनुदान प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ५० हजार पर्यंतचा समावेश आहे. बँकेचे कर्ज ७५ टक्के देण्यात येते व सदर कर्जावर बँकेच्या नियम ाप्रमाणे व्याजदर आकारण्यात येतो. महामंडळाचे व बँकेच्या कर्जाची परतफेड एकाच वेळेस ठरवून दिलेल्या समान मासिक हप्त्यानुसार तीन ते पाच वर्षाच्या आत करावी लागते. अर्जदारास पाच टक्के स्वतःचा सहभाग भरावयाचा आहे.

थेट कर्ज योजना - या योज-नेची प्रकल्प मर्यादा १ लाख रुपये पर्यंत असून प्रकल्प मर्यादेच्या ५० टक्के किंवा जास्तीत जास्त ५० हजार पर्यंत अनुदान देण्यात येते व उर्वरित रक्कम ५० हजार रुपये म हामंडळामार्फत चार टक्के द. सा. द. शे. व्याजदराने देण्यात येते. कर्जाची परतफेड सर्वसाधारणपणे तीन वर्षात करावयाची आहे.

एनएसएफडीसी योजना - प्रकल्प मर्यादा १ लाख ४० हजार ते दोन लाखपर्यंत असून एकूण प्रकल्पाच्या ९० टक्के एनएसएफडीसी, नवी दिल्ली यांच्या मार्फत प्राप्त होते. मात्र जास्तीत जास्त ५० हजारच्या कमाल मर्यादित अनुदान आहे व उर्वरित रक्कम बीज भांडवल स्वरुपात देण्यात येते. या योजनेसाठी अर्ज करण्यासाठी आवश्यक पात्रता अर्जदार अनुसूचित जातीतील हिंदू खाटिक संवर्गातील असावा व त्याचे वय १८ वर्षापेक्षा जास्त असावे. राज्य महामंडळाच्या योजनेकरिता वार्षिक उत्पन्न मर्यादा शहरी व ग्रामीण भागाकरिता तीन लाख रुपये इतकी आहे. अर्जदार हा महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा (राज्य / केंद्र) थकबाकीदार नसावा.

अर्ज करण्यास आवश्यक कागदपत्रे

जातीचा व उत्पनाचा सक्षम अधिकाऱ्यांनी दिलेला दाखला, पाच पासपोर्ट आकाराचे फोटो, रेशनकार्ड, मतदार ओळखपत्र, रहिवाशी प्रमाणपत्र, आधारकार्ड प्रत, पॅनकार्ड, कोटेशन, व्यवसायासाठी आवश्यक असल्यास जागेचा पुरावा, व्यवसायानुरुप इतर आवश्यक दाखले, आवश्यतेप्रमाणे प्रकल्प अहवाल.

व्यवसायानुरुप आवश्यकतेप्रम ाणे इतर दाखलेपत्र, उदा. वाहनाकरिता व व्यवसायाकरिता लायसन्स, परमिट, बॅज नंबर इत्यादी, बँकेचे खाते क्रमांक व पासबुकची झेरॉक्स प्रत आवश्यक असल्याचे प्रसिद्धी पत्रकात नमूद केले आहे.

# नागरिकांनी सजग आणि सतर्क राहून देश सुरक्षेचे कान आणि डोळे व्हावे : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**राष्ट्रीय तपास यंत्रणा प्रमुख डॉ. सदानंद दाते आणि रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्ष नीता अंबानी यांचा ग्लोबल पीस ऑनरने सन्मान**

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

मुंबई : दहशतवादाविरुद्धचे युद्ध संपलेले नाही. या दहशतवादाच्या विरोधात लढण्यासाठी प्रत्येक नागरिकाने सजग आणि सतर्क असले पाहिजे. कान आणि डोळे बनून सुरक्षेचे काम केले पाहिजे, असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले. दिवीजा फाउंडेशनतर्फे आयोजित करण्यात आलेल्या ग्लोबल पीस ऑनर कार्यक्रमात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख डॉ. सदानंद दाते, एनएसजी कमांडो सुनिल जोधा, रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्ष नीता अंबानी यांना ग्लोबल पीस ऑनर सन्मानाने गौरवण्यात आले. २६/११ या काळजाला भिडणाऱ्या घटनेला १७ वर्षे झाली असली तरी त्या दिवसाची वेदना आजही आ-पणा सर्वांच्या मनात कायम असल्याचे सांगून मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, मुंबईसह देशभरात भीतीचे वातावरण निर्माण करणाऱ्या या हल्ल्यातील शहीदांना आदरांजली देण्यासाठी आणि हुतात्म्यांच्या स्मृती ताज्या ठेवण्यासाठी हा कार्यक्रम महत्त्वाचा आहे. पह-लगाम येथे निष्पाप नागरिकांची हत्या करून दहशतवादी संघटना देशात अस्थिरता निर्माण करण्याचा प्रयत्न करत आ-हेत. अशा घटनांवरून आजही दहशतवादाचा धोका कायम असल्याचे स्पष्ट होत असून, प्रत्येक नागरिकाने सतर्क रा-हणे अत्यंत गरजेचे असल्याचे मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, २६/११ चा हल्ला हा ताज किंवा मुंबईपुरता मर्यादित नव्हता. जसा अमेरिका 'ट्विन टॉवर' हल्ला म्हणजे अमेरिकेच्या सार्वभौमत्वावरील हल्ला होता, तसाच २६/११ चा हल्ला हा संपूर्ण भारताच्या सार्वभौमत्व-ाला दिलेला मोठा धक्का होता. त्या काळात ठोस प्रतिउत्तर दिले असते तर कदाचित पुन्हा असा हल्ला झाला नसता. परंतु आता परिस्थिती बदलली असून भारत मजबूत, सक्षम आणि निर्णायक देश म्हणून जगासमोर उभा आहे. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने 'ऑपरेशन सिंदूर'द्वारे पाकिस्तानातील दहशतवादी तळांवर कारवाई करत जगाला आपली क्षमता दाखवून दिली. भारत निर्णायक कारवाई करणारा देश आहे. आज देशाची सुरक्षा यंत्रणा अत्यंत मजबूत झाली आहे. दिल्ली बॉम्बस्फोटापूर्वी सुरक्षा यंत्रणांनी मोठ्या प्रमाणात स्फोटक पदार्थ आणि शस्त्रे जप्त करून मोठा कट उधळून ला-वला आहे. दहशतवादी सरळ युद्ध करू शकत नाहीत म्हणून छुपे युद्ध सुरू आहे. अशा परिस्थितीत देशातील प्रत्येक नागरिकाने सतत जागरूक राहणे गरजेचे आहे. आजच्या दिवशी शहीद हेमंत करकरे, अश-ोक कामटे, विजय साळसकर, तुकाराम ओंबाळे, मेजर उन्नीकृष्णन आणि प्रकाश मोरे यांसह सर्व शूरवीरांना विनम्र अभिवादन करतो.

**मुंबईची संस्कृती खंबीर आहे; ती थांबत नाही, खचत नाही – उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे**

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे म्हणाले की, २६/११ हल्ल्यात मुंबईची संस्कृती, तिचा आत्मा आणि तिची आ-ळख लक्ष्य करण्यात आली होती. पण मुंबई थांबली नाही आणि खचली नाही. आपण या हल्ल्याला ठाम प्रत्युत्तर दिले. पहलगाम हल्ल्यानंतर भारताने पाकिस्तानला दिलेले उत्तर हे देशाच्या बदललेल्या सामर्थ्याचे द्योतक आहे.

सदानंद दाते आणि नीता अंबानी यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांनी सांगितले



की, अशा व्यक्तींचा देशाला अभिमान आहे. कार्यक्रमात २६/११ हल्ल्यात अतुलनीय धैर्य दाखवणारे वरिष्ठ पोलीस अधिकारी आणि राष्ट्रीय तपास यंत्रणेचे प्रमुख डॉ. सदानंद दाते यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कामा रुग्णालयातील ग्रेनेड हल्ल्यात गंभीर जखमी असूनही त्यांनी मागे न हटता अतिरेक्यांचा सामना केला आणि त्यांचा शेवट केला. शांतीदूत म्हणून काम करत असलेल्या आणि समाजामध्ये सकारात्मकता निर्माण करणाऱ्या रिलायन्स फाऊंडेशनच्या अध्यक्ष नीता अंबानी यांचा गौरव मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच २६/११ हल्ल्यात अतु-लनीय शौर्य दाखवणारे आणि 'जिंदा शहीद' म्हणून ओळखले जाणारे सुनिल जोधा यांनाही गौरवण्यात आले. श्री जोधा यांनी या हल्ल्यावेळी शरीरावर २० गोळ्या झेलल्या ज्यातील एक आजही त्यांच्या शरीरात आहे. या कार्यक्रमामध्ये पहल-गाम हल्ल्यात जीव गमावलेल्या नागरिकांच्या नातेवाईकांनाही सन्मानित करण्यात आले तसेच २६/११ या हल्ल्यातील शहिदांच्या कुटुंबीयांनाही सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमास विधानसभा अध्यक्ष राहुल नार्वेकर, कौशल्य विकास, नाविन्यता आणि रोजगार मंत्री मंगलप्रभात लोढा, सांस्कृतिक कार्य मंत्री आशिष शेलार, मुकेश अंबानी, यांच्यासह बॉलिवूड म धील कलाकार आणि मान्यवर उपस्थित होते.

**अंत्री खेडेकर येथील शेतकऱ्यांच्या १६ स्पिंकलर तोट्या लंपास** **नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण**

# अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या गावांमध्ये भुरट्या चोरट्यांचा सुळसुळाट !

**दैनिक यश सिद्धी न्यूज नेटवर्क**

राहुल साबळे /बुलढाणा जिल्हा प्रतिनिधी : चिखली तालुक्यातील अंढेरा पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या अंत्री खेडेकर येथील शेतकरी एकनाथ माळेकर यांच्या अंत्री शिवारातील गट नंबर ५७ मध्ये दोन हेक्टर जमीन असून सदर शेतीमध्ये यावर्षी मक्याचे पिक घेतले आहे. दिनांक १९ नोव्हेंबर २०२५ रोजी सायंकाळी सहा वाजेच्या सुम ारास शेतकऱ्याने मकाच्या शेतामध्ये स्पिंकलर लावून ठेवले होते.सायंकाळी साडेसहा वाजता घरी गेले. दिनांक २० नोव्हेंबर रोजी सकाळी ६:०० वाजेच्या सुमारास शेतामध्ये गेले असतांना पाणी उडताना दिसले. यावरून शेतकऱ्याने विहिरीवर जाऊन मोटर पंप बंद करून शेतामध्ये गेले असता, लावलेल्या कावेरी, जिंदाल व जैन कंपनीच्या १६ तोट्या त्यांना दिसून आल्या नाही. यावरून त्यांच्या शेतातील कावेरी ,जिंदाल व जैन कंपनीच्या १६ तोट्या प्रत्येकी नग ८५० रुपये प्रमाणे किंमत १३६०० रुपये अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची त्या शेतकऱ्यांनी तक्रार अंढेरा पोलीस स्टेशनला दिली आहे.या शेतात सुरू असलेल्या तुषार संचाने पाणी देण्याच्या स्प्रिंकलरच्या तोट्या चोरट्यांनी रातोरात लंपास केल्याने अंढेरा पोलीस स्टेशनचे ठाणेदार यांच्यासमोर आव्हान उभे केले आहे. रात्रीतून जवळपास १६ तोट्या चोरट्याने लंपास केल्या आहेत .त्यामुळे आधीच विजेच्या लपंडावाने त्रस्त असलेल्या शेतकऱ्यासमोर मोठे संकट उभे राहिले आहे. स्पिंकलरच्या तोट्या चोरणाऱ्या चोरट्यांचा पोलिसांनी ताबडतोब बंदोबस्त करावा अशी मागणी ऐरणीवर आली आहे. अंढेरा पोलीस स्टेशन पासून अवघ्या दहा ते पंधरा किलोमीटर अंतरावर असलेल्या मेरा खुर्द, मेरा बुद्रुक,गुंजाळा ,मनुबाई या गावांमध्ये सध्या शेती पेरण-ीचे काम सुरू आहे व शेतीला पाणी देण्याचे काम सुद्धा सुरू आहे. या तोट्या चोरीमुळे एकच खळबळ अंत्री खेडेकर, मेरा बुद्रुक सह परिसरात तील गावामध्ये उडाली आहे. आधीच शेतकरी अस्मानी आणि सुलतानी संकटाशी लढत असतानाच चोरट्यांनी चोरीचा धुमाकूळ घातल्यामुळे शेतकऱ्यावर खूप मोठे संकट कोसळले



आहे. अंत्री खेडेकर येथील एकनाथ माळेकर यांच्या शेतातील काल रात्री चोरट्यांनी १६ स्पिंकलरच्या तोट्या लंपास केले आहेत ही गोष्ट आज सकाळी शेतकरी एकनाथ माळेकर आपल्या शेतामध्ये सकाळी गेले असता त्यांच्या लक्षात आली या चोरट्यामुळे शेतकऱ्यांसमोर मोठे संकट उभे राहिले आहे. चोरट्यांनी अंढेरा पोलीस स्टेशनला सुद्धा मोठ्या आव्हान दिले आहे. आता अंढेरा पोलीस स्टेशनचे कर्तव्यदक्ष ठाणेदार रुपेश शक्करगे हे चोरट्यांच्या मुस्क्या आवळण्यात यशस्वी होतात की नाही याकडे शेतकऱ्यांचे लक्ष लागून आहे. शेतकऱ्यांना शेतीसाठी वीजपुरवठा नाही त्यामुळे शेतकरी हा तुषार सिंचनाच्या भरोशावर शेती करत आहे .परंतु चोरट्यांनी तुषार सिंचनाचे जवळजवळ सोळा तोट्या या भागातील चोरून नेल्या आहेत त्यामुळे शेतकऱ्याला खूप मोठे संकट उभे राहीले आहे .तरी स्थानिक पो-लीस स्टेशनच्या कर्मचाऱ्यांनी या चोरीचा छडा लावून परिसरातील शेतकऱ्यांना न्याय द्यावा अशी मागणी या परिसरातील शेतकरी वर्गातून होत आहे.